## राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

**नवीन प्रशासकीय भवन, मंत्रालयासमोर,**
**मादाम कामा रोड, मुंबईः- ४०० ०३२.**
**दिनांक- १९ जानेवारी, २००५.**

## आ दे श

क्रमांक-रानिआ/मनपा-२००५/प्र.क्र.२/का-५.भारतीय संविधानातील अनुच्छेद २४३ झेडए व मुंबई महानगरपालिका अधिनियमातील कलम ५अ, १८अ, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९ चे कलम ५ व कलम १४ आणि नागपूर शहर महानगरपालिका अधिनियमाच्या कलम ९, ९अ व ९ब याद्वारे प्राप्त झालेल्या अधिकारांचा व याबाबत प्राप्त झालेल्या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन मी, नन्द लाल, राज्य निवडणूक आयुक्त, महाराष्ट्र पुढीलप्रमाणे आदेश देत आहे :-

| अ.क्र. | करावयाची कार्यवाही | ते करण्यासाठी जबाबदार अधिकारी |
|---|---|---|
| १. | महानगरपालिका क्षेत्राचे प्रभागांमध्ये विभाजन करणे आणि प्रभागांच्या सीमा निश्चित करणे व त्यांचे प्रकाशन | राज्य निवडणूक आयुक्त |
| २. | अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती यांचे आरक्षण ठरविणे | राज्य निवडणूक आयुक्त |
| ३. | नागरिकांमधील मागासवर्ग व महिला (अनुसूचित जाती व जमातींच्या महिलांसह) यांच्या आरक्षणासाठी सोडत काढणे | महानगरपालिका आयुक्त |
| ४. | प्रभाग रचनेचे प्रारुप प्रसिध्द करणे | राज्य निवडणूक आयुक्त |
| ५. | प्रभाग रचनेसंबंधी हरकती व सूचना स्वीकारणे | महानगरपालिका आयुक्त किंवा त्यांनी प्राधिकृत केलेला उपायुक्त दर्जापेक्षा कमी नाही असा अधिकारी |
| ६. | प्रभाग रचनेसंबंधी हरकती व सूचनांची सुनावणी देणे | राज्य निवडणूक आयुक्त किंवा त्यांनी प्राधिकृत केलेला राज्य निवडणूक आयोगाचा अधिकारी आणि महानगरपालिका आयुक्त किंवा राज्य निवडणूक आयुक्तांनी प्राधिकृत केलेला शासकीय किंवा महानगरपालिकेचा अधिकारी |
| ७. | अंतिम प्रभाग रचना प्रसिध्द करणे | राज्य निवडणूक आयुक्त |

याबाबत यापूर्वी काढलेले सर्व आदेश या आदेशामुळे सुधारित करण्यात आले आहेत, असे मानण्यात येईल.

२. प्रारुप प्रभाग रचना प्रसिध्द करणे व अंतिम प्रभाग रचना प्रसिध्द करणे याबाबत महानगरपालिका आयुक्त राज्य निवडणूक आयुक्तांना अधिसूचनेचे प्रारुप सादर करतील व राज्य निवडणूक आयुक्तांची मान्यता घेऊन ते प्रारुप त्या महानगरपालिकेच्या संबंधित राजपत्रात प्रसिध्द करतील.

( नन्द लाल )
राज्य निवडणूक आयुक्त,
महाराष्ट्र

प्रति,
सर्व महानगरपालिका आयुक्त
राज्य निवडणूक आयोगातील सर्व अधिकारी